hisr
Y.P. Solu

ISSN : 2278-9308

ONE DAY INTERDISCIPLINARY

# NATIONAL CONFERENCE ON

# Indian Social Reformers & Their Thoughts

**19 February 2016**

Monthly Peer Reviewed International Research Journal
Conference Special Issue



Director
Prof. Virag S. Gawande

Editor
Prof. Rajendra S. Korde

Organized by

AADHAR SOCIAL RESEARCH & DEVELOPMENT TRAINING INSTITUTE, &
ARTS,COMMERCE COLLEGE WARWAT BAKAL TQ.SANGRMPUR DIST- BULDHANA

# INDEX



| | Author | Title of Research Paper | Pg.No. |
|---|---|---|---|
| 1 | प्रा. नंदकिशोर प्रेमचंद सिंगाडे | दादाभाई नौरोजींचे आर्थिक विचार | 1 |
| 2 | प्रा. शुभदा शिवपूजे - उपासे | गुरुदेव रविंद्रनाथ टागोरांचे शैक्षणिक कार्य | 6 |
| 3 | प्रा. डॉ. तानाजी ज्ञानदेव पाटील | पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील | 10 |
| 4 | प्रा. डॉ. वाय एम. साळुंके | महात्मा फुलेंचे शैक्षणिक विचार व कार्य | 13 |
| 5 | प्रा. प्रविण कारभारी शिंदे | महात्माफुलेंचे स्त्रिवादीकार्य | 19 |
| 6 | कविता एन.खरात | महिला सशक्तीकरणात डॉ.आंबेडकरांचे योगदान | 22 |
| 7 | प्रा.डॉ.मनीषा बनसोडे | स्त्रिमुक्तीचे प्रणेते महात्मा जोतीराव फुले | 26 |
| 8 | प्रा.डॉ.मंगला अरूण निकुंभ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक व सामाजिक सुधारणांबाबतचे विचार | 30 |
| 9 | प्रा. सतिश हरलाल पारधी | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार | 34 |
| 10 | प्रा. डॉ. आर. वाय. खंडाईत | महात्मा गांधी यांचे शैक्षणिक कार्य | 38 |
| 11 | प्रा.प्रेमसिंग मानसिंग गिरासे | कर्मवीर विठ्ठलरामजी शिंदे | 42 |
| 12 | प्रा. कल्पना राजेश कनके | भारतीय समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले | 44 |
| 13 | डॉ. अमोल मांडेकर | महात्मा गांधी – युगपुरूष | 51 |
| 14 | डॉ. गया (जया) लालाजी जांभुळकर | ज्योतिबा फुलेंचे जीवन व कार्य | 55 |
| 15 | प्रा.डॉ.चंद्रकिरण घाटे | भारतीय (हिन्दूस्थानी) संगीत व रविंद्र संगीत" : एक चिकित्सक अभ्यास | 60 |
| 16 | डॉ. वीणा वा. लाडे – नारायणे | शिक्षण तपस्वी – कर्मवीर भाऊराव पाटील | 63 |
| 17 | प्रा. डॉ. सौ. दीपा यशवंत कुलकर्णी | महात्मा गांधी आणि महिला सबलीकरण | 68 |
| 18 | डॉ. डी. व्ही. चांदणे | भारतीय साहित्यामध्ये परिवर्तनाचे - बिजं पेरणारा साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे | 73 |
| 19 | प्रा.प्रल्हाद दत्तराव भोपे | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा सामाजिक समस्यासंदर्भातील दृष्टिकोन (व्यसन व अंधश्रध्दा) | 77 |
| 20 | प्रा.प्रज्ञा कांबळे शिरगावकर | महात्मा जोतिबा फुले यांचे सामाजिक कार्य | 82 |
| 21 | प्रा. डॉ. सौ. यु. आर. पाटील | क्रांतिकारी समाजसुधारक महात्मा फुले. | 87 |
| 22 | प्रा.संगिता बावगे - ब्याळे | संत गाडगे महाराजांचेः लोकशिक्षणाचे कार्य' | 92 |
| 23 | विलासिनी मो. ठिगळे | सत्यशोधक – कर्मवीर भाऊराव पाटील | 96 |
| 24 | महाजन संजय बाबुराव | महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार आणि वर्तमान समर्पकता | 98 |

ISSN - 2278-9308

# महात्मा फुलेंचे शैक्षणिक विचार व कार्य

प्रा. डॉ. वाय एम. साळुंके
कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, ओझर मिग, ता. निफाड जि. नाशिक

स्वातंत्र्य, समता, आणि बंधुभाव या त्रिसूत्रीवर भरवसा ठेवणारे, शेतकरी आणि श्रमस्त यांच्या दु:खाचे व दारिद्रयाचे निवारण करण्यासाठी चळवळ करणारे, सत्यशोधक समाजाची स्थापना करणारे, दलितांचे आदय सुधारक, स्त्री आणि शुद्रांचा उदधार होण्यास झटणारे आणि सामाजिक विषमतेच्या विरोधात आवाज उठविणारे महात्मा ज्योतिबा फुले हे जनसामान्यांच्या, शिक्षणासाठी पुढे सरसावणारे पहिले महापुरूष होते. ते महाराष्ट्राचे मार्टिन ल्युथर म्हणून ओळखले जातात. महात्मा ज्योतिबा फुले हे मानवतावादी होते. महात्मा फुलेच्या मते, प्रथम खालच्या वर्गातील लोकांना शिक्षण देऊन नंतर वरच्या वर्गातील लोकांना शिक्षण दयावे. आधी कळस मग पाया असे न होता. प्रथम उपेक्षितांना शिक्षण नंतर अपेक्षितांना शिक्षण, हे सूत्र इंग्रजांनी अंमलात आणावे या मताचे ज्योतिराव फुले होते.

शिक्षण आणि समता या दोन शब्दात महात्मा फुल्यांचे जीवनकार्य साठवलेले आहे. शुद्र आणि स्त्रिया यांना शिक्षणाची दारे खुली करण्यासाठी महात्मा फुले आयुष्यभर झटले. मुली शिकल्या तर पुढची पिढी ज्ञानी होईल यावर त्यांचा विश्वास होता. त्यांच्या जीवनाची चतु:सूत्री म्हणजे सदाचार, विवेक, न्यायप्रियता आणि सहिष्णुता होय. सामान्य व्यक्तीला प्रथम शिक्षणाने विभूषित करणे हा त्यांच्या शैक्षणिक विचारांचा पाया होता.

**महात्मा फुलेंचे शिक्षण विषयक विचार**

**स्त्री शिक्षणाचा पाठपुरावा :-**

स्त्रियांना शिक्षण मिळावे या मताचे महात्मा ज्योतिबा फुले होते. समाजक्रांतीचे पहिले शस्त्र म्हणून महात्मा ज्योतिबा फुल्यांनी स्त्री शिक्षण हाती घेतले होते. त्यांच्यावेळी स्त्रियांना शिक्षण देणे म्हणजे कुकर्माला लावणे अशी समजूत होती. तिला शिक्षण दिल्याने अकाली वैधव्य प्राप्त होईल अशी समाजाची धारणा होती. स्त्रियांना शिक्षण देणे म्हणजे भ्रष्ट्राचार करणे असे सनातनी लोकांना वाटे. शुद्रांना शिक्षण देऊ नये, कारण त्यांना विद्येचा मुळीच अधिकार नाही असे सनातन्यांचे मत होते. त्यामुळे स्त्रियांना शिक्षणाची दारे बंद ठेवण्यात आली होती. पण महात्मा फुल्यांना त्याची पर्वा वाटत नव्हती. त्यांना वाटत होते की स्त्री शिक्षण म्हणजे पर्यायाने तिच्या मुलास शिक्षण देणे होय. म्हणून त्यांनी स्त्री शिक्षण सर्वप्रथम हाती घेतले.

शिक्षण हे समर्थ स्त्री म्हणून जगण्यासाठी दिले जावे. स्त्रिचा खरा धर्म म्हणजे तिला शिक्षण देणे होय. असे त्यांना वाटे. तिच्या मानसिकतेसाठी व समर्थ स्त्री म्हणून जगण्यासाठी शिक्षण देणे गरजेचे ठरते असे त्यांचे मत होते. सनातनी लोकांच्या बुरसटलेल्या विचारांना मूठमाती देऊन महाराष्ट्रात महात्मा फुल्यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी शाळेचे दरवाजे खुले करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. त्यामुळे स्त्रियांना शिक्षण घेण्याकडे ओढ लागली.

**प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत :**

दलित, शोषित आणि पिडित तसेच सर्व शुद्र जातीच्या लोकांना शासनाने प्राथमिक शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली पाहिजे, यासाठी महात्मा ज्योतिबा फुल्यांनी शासन दरबारी मागणी केली होती. गरीब लोकांकडून शासन कर वसूल करते. म्हाणून शासनाने हे कर्तव्य ठरते की, त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी शासनानेच घ्यावी. एवढेच नव्हे तर बारा वर्षाखालील सर्व बालकांना सक्तीचे आणि मोफत प्राथमिक शिक्षण देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. अशी महात्मा ज्योतिबा फुल्यांनी जोरदार मागणी केली होती.

प्राथमिक शिक्षण सक्तीचे मोफत असले पाहिजे अशी मागणी करणारे ते पहिले भारतीय होत. या मागणीचा पाठपुरावा त्यानी १९ आक्टोंबर १८८२ मध्ये हंटर शिक्षण आयोगापुढे एका निवेदनाद्वारे केला होता. त्यात ते म्हणतात.

"सरकार जर जनतेच्या शिक्षणावर अधिक भर देईल तर नीतीच्या आणि सद्वर्तनाचा दृष्टीने कितीतरी चांगले लोक तयार होतांना मुळीच अडचण पडणार नाही.

**प्राथमिक शिक्षणाकडे अधिक लक्ष देण्याची गरज :-**

सरकारी वरिष्ठ पदावर उच्चवर्णियांची मक्तेदारी झाली आहे. याचे कारण त्यांना उच्च शिक्षण घेण्याची तरतूद होय. म्हणून बहुजन समाजातील खेडयात राहणाऱ्या लोकांना प्राथमिक शिक्षण मिळण्याची तरतूद करणे सोयीचे आहे असे महात्मा फुल्यांना वाटे. यासाठी उच्च शिक्षणाकडे कमी व ग्रामीण जनतेच्या प्राथमिक शिक्षणाकडे जास्त लक्ष दिल्यास प्राथमिक शिक्षणाचा प्रसार अधिक होईल ते नोकरी करण्यास सक्षम होतील. प्राथमिक शिक्षणास सर्व शिक्षणाचा पाया समजला जातो. म्हणून प्राथमिक शिक्षणाची शासनाने अधिक सोय केली पाहिजे.

**प्राथमिक शिक्षणासाठी प्रशिक्षित शिक्षकांची तरतूद करणे : -**

प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केल्याने विद्यार्थ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ होण्याची शक्यता होती. त्यामुळे त्यांना उच्च दर्जाचे दर्जेदार शिक्षण देण्यासाठी प्रशिक्षित शिक्षकांची नेमणूक केली पाहिजे यावर महात्मा फुल्यांनी भर दिला होता. १९ आक्टोंबर १८८२ रोजी त्यांनी हंटर आयोगासमोर आपले म्हणणे मांडताना सांगितले की, "प्राथमिक शाळांसाठी शक्यतो प्रशिक्षित शिक्षक असावेत आणि ते शेतकरी वर्गातील असावेत. त्यामुहे ते मुलांच्या गरजा ओळखून, त्यांना समजांवून शिक्षण देतील. प्राथमिक शालेय अभ्यासक्रमात आरोग्य आणि शेती, ग्रामोद्योग, कला अशा विषयांना प्राधान्य दिले पाहिजे. शहरी विद्यार्थ्यांना जो अभ्यासक्रम राहील त्यापेक्षा कमी अभ्यासक्रम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा असला पाहिजे. यावरही महात्मा ज्योतिबा फुल्यांनी भर दिला होता.

**ग्रामीण भागातील मुलांमुलीच्या शिक्षणाची तरतूद करणे :-**

बहुजन समाज ग्रामीण भागात राहतो. त्यांच्या शिक्षणाची महात्मा फुल्यांना विशेष काळजी वाटत होती. २ मार्च १८८८ रोजी पुणे येथे

डयुक ऑफ कॅनाट यांच्या मेजवानी प्रसंगी महात्मा फुले म्हणाले होते की, "खरा हिंदुस्थान खेडयात राहतो. खेडयातील लोक निर्धन, भुकेकंगाल आणि बेघर असता. ते अनवाणी चालतात. महाराणी व्हिक्टोरिया हिला असे सांगा की, गरीब जनता दारिद्रियामध्ये पिचत असून त्यांना शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे." यावरून महात्मा ज्योतिराव फुल्यांना खेडयातील गरीब जनतेच्या शिक्षणाची किती तळमळ होती हे दिसते. म्हणून शासनाने ग्रामीण भागातील मुलांमुलींना शिक्षण देण्याची व्यवस्था केली पाहिजे.

**राष्ट्रनिर्माणासाठी मागास वर्गीयांना शिक्षण देणे आवश्यक आहेः-**

राष्ट्राची संकल्पना स्पष्ट करतांना महात्मा ज्योतिबा फुले म्हणतात, "जोपर्यंत, शुद्रातिशुध्द, भिल्ल, कोळी इत्यादी, शिक्षित होऊन वैचारिक व समानरूपाने एकरूप होत नाही. तोपर्यंत राष्ट्र बनू शकत नाही." ज्या देशात सामाजिक आणि आर्थिक गुलामी असते तेथे राष्ट्रवाद निर्माण होऊ शकत नाही. भारत माझा देश आहे व सर्व भारतीय माझे देशबांधव आहेत. असे समजल्याने सर्वांना एकरूपतेची जाणीव होईल. हे समजण्यासाठी व सामाजिक आणि आर्थिक समानता आणण्यासाठी भिल्ल, कोळी इत्यादी वर्गांना शिक्षणाची दारे खुली केली पाहिजेत. यावर महात्मा, फुल्यांचा भर होता. त्यामूळे राष्ट्रनिर्माण होण्यास मदत होऊ शकते.

**शिक्षणप्रणालीत आमूलाग्र बदल करणे आवश्यक आहेः-**

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या काळात जी शिक्षण पध्दती सुरू होती ती बहुजन समाजाला शिक्षणापासून वंचित करणारी होती. त्यांच्या मते, प्रचलित शिक्षण प्रणाली फक्त कारकून व शिक्षक निर्माण करणारा एक कारखाना होय. या शिक्षण प्रणालीत मॅट्रिक पास होण्यास वाजवीपेक्षा जास्त महत्त्व दिले जात होते. अनेक वर्षांपासून ही शिक्षण प्रणाली सुरू असल्याने अनेक विद्यार्थी मॅट्रिकपास होऊन नोकरीसाठी वणवण भटकत होते. त्यामुळे महात्मा फुलेंनी त्या काळातील शिक्षण पध्दतींवर त्यांनी कडाडून हल्ला केला होता. म्हणून शिक्षणप्रणाली बदलली पाहिजे यावर महात्मा फुल्यांनी भर दिला होता. शिक्षणाच्या आमूलाग्र पुनर्रचनेची महात्मा ज्योतिबा फुल्यांची मागणी आज रास्त असल्याचे दिसून येते.

ISSN - 2278-9308

**व्यावसायिक व औद्योगिक शिक्षणास तांत्रिक शाळांची स्थापना करणे :-**

भारतात बहुसंख्य लोक खेड्यात राहतात. त्यांना तेथे व्यवसायाची संधी उपलब्ध नसते. म्हणून त्यांच्यामध्ये बेरोजगारीची समस्या निर्माण होते. यासाठी महात्मा ज्योतिबा फुले म्हणतात की, ग्रामीण भागात शेतकी आणि ग्रामीण व शहरी भागात व्यावसायिक शिक्षण देण्यासाठी तेथे तांत्रिक शाळा सुरू केलया पाहिजेत. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना विविध व्यवसाय करण्याची संधी मिळेल. तसेच शहरी भागातील लोकांना विविध उद्योगधंदे करण्यास वाव मिळेल.

**शिक्षणात त्रिभाषा सूत्राचा अवलंब करणे :-**

स्वतंत्र भारतात शिक्षणाचा आकृतिबंध असावा यासाठी अनेक आयोगाची स्थापना करण्यात आली होती. त्यापैकी कोठारी शिक्षण आयोगाने (१९६४-६६) शिक्षण प्रणालीचा आराखडा तयार करतांना त्रिभाषा सूत्राचा (Three-Language Formula) शिक्षणात अंतर्भाव असावा अशी शिफारस केली होती. म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्यांस त्याची मातृभाषा, दुसरी भाषा इंग्रजी आणि तिसरी राष्ट्र भाषा म्हणून हिंदी शिकण्याची संधी देण्यात आली. परंतु त्यांच्या आधी कितीतरी वर्षे (७७ वर्षे) अगोदर महात्मा ज्योतिबा फुल्यांनी त्रिभाषा सूत्राचा पुरस्कार केला होता,

महात्मा फुलेंच्या मते स्वभाषा म्हणजे मातृभाषा, इंग्रजी ही दुसरी परकीय भाषा आणि हिंदी ही राष्ट्रभाषेच्यारूपाने तिसरी भाषा शिकण्यावर भर देण्यात आला होता. हेच महात्मा ज्योतिराव फुल्यांचे त्रिभाषा सूत्र होय. ह्या तिन्ही भाषांमध्ये जे तरबेज असतील तेच सद्गुणी संपन्न आणि सन्मानित होतील या मताचे महात्मा फुले होते. शिक्षणाच्या आकृतीबंधात या त्रिभाषा सूत्राचा वापर करणे गरजेचे आहे, असे त्यांचे मत होते.

**शैक्षणिक शिष्यवृत्ता आणि वसतिगृहाची सोय करणे :-**

जनसामान्यात शिक्षणाचा प्रसार व्हावा, त्यांच्यामध्ये शिकण्याची जिज्ञासा, अभिरूची निर्माण करणे गरजेचे वाटत होते. त्यासाठी शासनाने सवलती दिल्या पाहिजेत असे त्यांना वाटे त्यांच्या मते, "सामान्य व्यक्तीचे अज्ञान आणि अंधश्रध्दा दूर करण्यासाठी ब्रिटिश सरकारने त्यांच्या शिक्षणात रस घेतला पाहिजे" वरच्या थरापासून खालच्या थरापर्यंत शिक्षण पाझरत आले पाहिजे. या लॉर्ड मेकॉले, यांच्या शिफारशींना महात्मा फुल्यांनी कडाडून विरोध केला. याचे कारण म्हणजे वरच्या वर्गातील लोक शिकल्यावर खालच्या वर्गातील लोकांना शिक्षण देण्यास तयार होत नव्हते. यासाठी दलित, वंचित इत्यादी शुद्र जातींच्या लोकांना शिक्षण देण्याची व्यवस्था ब्रिटिश शासनानेच करावी असे प्रतिपादन केले होते. यासाठीच महात्मा फुल्यांनी हंटर आयोगाला विरोध दर्शविला होता. म्हणून बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार सत्वर करण्यासाठी त्यांना शिष्यवृत्त्या, वसतिकृहांची सोय करण्यात यावी, याचा पाठपुरावा त्यांनी केला होता.

**शिक्षण म्हणजे माणसाचा तिसरा डोळाच :-**

महात्मा ज्योतिबा फुले हे शिक्षणाला तिसरा डोळा म्हणून संबोधतात. त्यांनी तृतीय रत्न हे शीर्षक असलेले नाटक लिहिले. त्या नाटकात पंडित-पुरोहित धर्माच्या नावावर खोटे प्रलोभन देऊन अशिक्षित शुद्रांना कसे फसवतात आणि ख्रिश्चन पदारी निष्पक्ष धर्माच्या आधारावर अशिक्षित शुद्रांना खरे ज्ञान देऊन कसा योग्य मार्ग सांगतात हे यात दर्शविलेले आहे. आपला बहुसंख्या समाज निरक्षर असून त्यास लिहिता वाचता येत नव्हते, हे महात्मा फुलेंच्या लक्षात आले होते. म्हणुन त्यांनी समाज प्रबोधनातून शिक्षणाचा मंत्र तृतीय रत्न या नाटकातून मांडला. यात रत्नचा वापर नेत्र म्हणजेच डोळा या अर्थाने केला असावा. म्हणून शिक्षणाला त्यांनी माणसाचा तिसरा डोळा म्हटले आहे. एक अडाणी, अशिक्षित शुद्र पतीपत्नी हे ख्रिश्चन पदाऱ्याचे विचाराने प्रभावित होऊन अशिक्षित व शुद्रजातीच्या लोकांना पंडित-पुरोहित कसे लुबाडतात. हे त्यांच्या लक्षात आले आणि शिकणे, वाचने व लिहिणे यांचे महत्त्व त्यांना समजले. शिक्षण घेण्याची प्रेरणा त्यांच्यामध्ये निर्माण झाली. अशाप्रकारे शिक्षणरूपी त्यांनातिसरा डोळाच मिळाला. म्हणून महात्मा ज्योतिबा फुल्यांनी शिक्षणावर अधिक भर दिलेला दिसून येतो.

**महात्मा फुलेंचे शैक्षणिक कार्य**

**सत्यशोधक समाजाची स्थापना :-**

समाजामध्ये असलेल्या अनिष्ठ रूढी, परंपरा, वाईट चालीरिती व सत्यधर्माची महती पटवून देण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना २४ सप्टेंबर १८७३ रोजी केली. समाजातील अनिष्ठ परंपरा, अंधानुकरण यातून मार्ग काढण्यासाठी कार्य करण्याचे ठरवून समाजाला स्वातंत्र्य, समता, बंधुभाव आणि माणुसकी या चतु:सूत्रीवर आधारित संदेश बहुजन समाजाला सांगून समाजातील दुर्बल, वंचित घटकांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देण्यासाठी त्यांनी विडाच उचललेला होता.

सत्यशोधक समाजाने समाज जागृतीचे कार्य केले. त्यामुळे समाजात नवचैतन्य निर्माण झाले होते. धनंजय कीर यांच्या मते, "महाराष्ट्रातील ग्रामीण भागात राहणाऱ्या मागासवर्गीय आणि वंचित घटकांना शिक्षण देणारी, सत्यशोधक समाज ही पहिली संस्था होती." या संघटनेद्वारे महात्मा ज्योतिबा फुल्यांनी सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षणाची गंगा ग्रामीण भागापर्यंत पोहचविली पाहिजे याची ब्रिटिश शासनास जाणीव करून दिली होती. त्यांनी अनाथ स्त्रियांचे संगोपन, विधवा विवाह, पुर्नविवाह याविषयी समाजात जागृती करून त्यांना सन्मानपूर्वक जीवन जगण्याची जागृती निर्माण केली.

**स्त्री शिक्षणविषयक कार्य:-**

महात्मा ज्योतिबा फुल्यांनी स्त्रियांना शिक्षण मिळावे या विषयी भरघोस प्रयत्न केले. १८४८ रोजी पुण्यात भिडेवाडयात मुलींच्या शिक्षणासाठी पहिली शाळा स्थापन केली. त्यावेळी महात्मा ज्योतिबा फुले केवळ एकवीस वर्षांचे होते. या शाळेसाठी भिडेनी दरमहा पाच रूपये देण्याचे कबूल केले. तसेच प्रारंभिक खर्चासाठी शंभर रूपये दिले होते. यामुळे स्त्री शिक्षणाचे महत्त्व लोकांना पटवून देण्यासाठी व त्यांच्या मुलींना शिक्षणाकडे आकृष्ट करण्यासाठी हा ज्योतिरावांचा पहिला खडतर प्रयत्न होता. त्या प्रयत्नास चांगला प्रतिसाद मिळताच १८५१ रोजी पुण्यात चिपळूणकरांच्या वाडयात बुधवार पेठेत मुलींची दुसरी शाळा स्थापन केली. मुलींची संख्या दिवसेंदिवस वाढत होती. त्यामुळे लगेच १८५२ रोजी पुणे येथील रास्ता पेठेत मुलींची तिसरी शाळा स्थापन केली. याच वर्षी पुण्यात वेताळ पेठेत अस्पृश्यांसाठी चौथी शाळा सुरू केली. या शाळेस महार-मांग इत्यादी लोकांना विद्या शिकविणारी मंडळी असे नाव दिले होते.

सर्व प्रथम महात्मा फुले हे स्वतः मुलींना शिकविण्याचे कार्य करीत होते. ते भारतातील आदय शिक्षक होत. पण शाळांचा व्याप लक्षात घेऊन आणि मुलींना शिकविण्यास शिक्षिका असल्यास योगय होईल असे त्यांना वाटे. परंतु मुलींना शिकविण्यास शिक्षिका मिळत नव्हत्या. यासाठी महात्मा फुल्यांनी आपल्या धर्मपत्नी सावित्रीबाई फुलेंना स्वतः शिकविले आणि त्यांना शिक्षिका केले. सावित्रीबई फुले ह्या भारतातील पहिल्या शिक्षिका होत.

**बहुजन समाजातील मागासलेल्या मुलांच्या शिक्षणाचे कार्य:-**

भारतात ब्रिटिशांच्या जोखडातून सोडविण्यासाठी बहुजन समाजातील जनतेला सर्वप्रथम शिक्षण देणे गरजेचे आहे, याची तळमळ महात्मा फुलेंना लागलेली होती. त्यांच्या शिक्षणासाठी इंग्लंडच्या राणीकडे आर्थिक मदतीसाठी मागणी केली. गरीब मुलांच्या शिक्षणासाठी वसतिगृहे, मागासवर्गातील शिक्षक, मागासवर्गीय मुलांना व्यावसायिक शिक्षण इत्यादीसाठी मागण्या मांडल्या व कार्यास लागले. शिक्षणाद्वारे मागासवर्गीयातील अंधश्रध्दा, दारिद्रय, गुलामगिरी, कर्जबाजारीपणा यातून शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी महात्मा फुल्यांनी शिक्षणाचा प्रसार शीघ्र गतीने सुरू ठेवला. इंग्रज राजवटीत शेतकऱ्यांकडून शेतसारा वसूल करण्यात येत असे. शेतसाऱ्याच्या मोबदल्यात भारतीयांना शिक्षण देण्याची व्यवस्था करावी यासाठी भारतीय समाजात जनमत तयार करण्याचे कार्य आरंभिले होते.

**अनाथ बालगृहाची स्थापना :-**

महात्मा ज्योतिबा फुल्यांनी एक अनाथ बालगृह स्थान केले होते. या अनाथालयत काशिबाई नावाची एक ब्राह्मण विधवा तेथे बाळंत होऊन तिला मुलगा झाला. महात्मा फुल्यांनी त्या मुलास दत्तक घेतले त्याचे नांव यशवंत असे ठेवले त्याचे लग्न करायाचे ठरल्यावर त्यास मुलगी देण्यास कोणी तयार होत नव्हते. परंतु ज्ञानोबा ससाणे हे आपली मुलगी देण्यास राजी झाले. व त्याचे लग्न ४ फरवरी १८८९ रोजी झाले. सव्वाशे वर्षापूर्वी महात्मा ज्योतिबा फुल्यांनी ज्या गोष्टी

केल्या. त्या आजसुध्दा होतील की नाही याची शंका येते. महात्मा फुल्यांनी ज्या आत्मविश्वासाने आणि जिद्दीने हे कार्य घडवून आणले ते अतिमोलाचे कार्य होय. म्हणून महात्मा फुले एक थोरपुरूष आणि विचारवंत होते.

**हंटर शिक्षण आयोगासमोर महात्मा ज्योतिबा फुलेंनी सादर केलेल निवेदन :-**

सर विल्यम विल्सन हंटर यांचे अध्यक्षतेखाली भारतात शैक्षणिक सुधारणा करण्यासाठी शिक्षण आयोगाची १८८२ रोजी स्थापना करण्यात आली. त्यास हंटर शिक्षण आयोग असे म्हणतात. हे शिक्षण आयोग भारतात आल्यावर भारतीय प्रतिनिधी म्हणून त्यांच्या समोर महात्मा ज्योतिबा फुल्यांनी १९ आक्टोंबर १८८२ रोजी एक निवेदन सादर केले. त्यात भारतात शिक्षण प्रणाली कशी असावी याबद्दल त्यांनी आपले शैक्षणिक विचार मांडले आहेत. त्यांचे हे कार्य ऐतिहासिक स्वरूपाचे समजले जाते त्यात प्रामुख्याने बारा वर्षे वयापर्यंतच्या मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे, लोकल सेस फंडापैकी निम्म्याहून अधिक भाग प्राथमिक शिक्षणासाठी खर्च करावा, प्राथमिक शाळांची संख्या वाढवावी, प्राथमिक शाळांना प्रांतिक सरकारने अधिक अनुदान दयावे, नगरपालिकांनी शाळांवर होणाऱ्या खर्चाची जबाबदारी घ्यावी, प्राथमिक शाळांचा कारभार शिक्षण खात्याच्या देखरेखीखाली चालावा, प्राथमिक शाळांतील शिक्षक प्रशिक्षित असावे, विद्येची आवड निर्माण होण्यास शिष्यवृत्यांची व सहामाही वा वार्षिक बक्षिसांची विशेष प्रलोभने ठेवणे,

**शिक्षण अभ्यासक्रमाबाबत महात्मा फुलेंचे मत:-**

महात्मा ज्योतिबा फुल्यांनी प्राथमिक शाळेतील अभ्यासक्रमात पुढील विषयांचा समावेश असावा असे हंटर आयोगास दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले होते. अभ्यासक्रमात मोडी-बालबोध, लेखनवाचन, हिशोबाची माहिती, सर्वसाधारण इतिहास, भूगोल, व्याकरण यांचे प्राथमिक ज्ञान, शेतीचे प्राथमिक ज्ञान तसेच नीती आणि आरोग्य या संबंधीचे धडे अंतर्भूत करावे. शहरातील व मोठया गावातील शाळांच्या अभ्यासक्रमापेक्षा खेडयातील शाळातील अभ्यासक्रम कमी असला पाहिजे. तसेच विद्यार्थ्यांना व्यावहारिक शिक्षण देण्यास आदर्श शेतीची लहानशी योजना आखावी. यांत्रिकी, नीतिबोध, आरोग्य, शेतकी, उपयुक्त कला या विषयावरील पाठ या पुस्तकामधून श्रेणीनुसार वाढत्या प्रमाणात देण्यात यावे. दर तीन महिन्यांनी शाळांची तपासणी करावी. कधी-कधी पूर्वसूचना न देता शाळांना भेटी द्याव्या. युरोपियन तपासनिसांची देखरेखही असावी.

**उच्च शिक्षण :-**

उच्च शिक्षणाविषयी महात्मा ज्योतिबा फुलेंनी पुढीलप्रमाणे आपले विचार हंटर आयोगाला दिलेल्या निवेदनात व्यक्त केले होते. धंदेशिक्षण असो वा कारभारविषयक शिक्षण असो सर्व पातळीवरच्या शिक्षण यंत्रणा सरकारी नियंत्रणाखालीच राहणे योग्य ठरेल, सर्वांना परवडेल अशी उच्च शिक्षणाची व्यवस्था असावी, पुस्तकांच्या यादया सरकारी राजपत्रात प्रसिध्द कराव्यात, खाजगिरित्या प्रवेश परिक्षेला बसण्यास मान्यता द्यावी.

ह्या शिफारशी हंटर शिक्षण आयोगाने जशाच्या तशा स्वीकारल्या नाहीत. त्यात बरेच बदल केले. हंटरने याविषयी नाराजी व्यक्त करतांन म्हटले की, "आपण लिहिलेल्या भागाची मांडणी अशारीतीने करण्यात आली आहे की, त्यात आपले असे काहीच राहिले नाही." यावरून असे निदर्शनास येते की, महात्मा फुल्यांनी सुचविलेल्या महत्त्वाच्या विचारांना केराची टोपली दाखविण्यात आली होती. महात्मा फुल्यांनाही ते समजल्यावर सार्वजनिक सतधर्म या पुस्तकात हंटरवर सडेतोड टिका केली होती.

**महात्मा फुल्यांच्या शैक्षणिक विचार आणि कार्याचे मुल्यमापन :-**

शिक्षण आणि समाज या दोन शब्दात महात्मा फुल्यांचे जीवनकार्य साठवलेले आहे. संपूर्ण समाज प्रगती आणि उत्पादनाच्या क्षितिजाकडे वाटचाल करण्यासाठी शिक्षणाची पायाभूत गरज असते. याकरिता विद्यार्जनासाठी धर्माने लादलेली बंधने तोडून स्त्रिया आणि अस्पृश्यांकरिता शिक्षणाची दारे मोकळी करणारे महात्मा ज्योतिबा फुले हे पहिले भारतीय क्रांतीसूर्य होत. स्त्री शुद्रतिशुद्रांना शिक्षणाची दारे मोकळी करण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले. त्यांच्या जीवनाची चतु:सूत्री म्हणजे सदाचार, विवेक, न्यायप्रियता आणि सहिष्णुता होय. बहुजन समाजाला व अस्पृश्यांना शिक्षणाची दारे खुली करण्यासाठी आणि ज्ञानाची गंगा त्यांच्या दारापर्यंत नेण्याचे महान कार्य महात्मा ज्योतिबा फुल्यांनी केले. उपेक्षित

समाजास शिक्षणाच्या मार्गाने समोर आणण्याचे कार्य त्यांनी केले. ते एक सत्यशोधक, समाजसुधारक, लोकशिक्षक होते. जनसामान्यांनी त्यांना महात्मा म्हणून गौरविले. ते मानवतावादी होते. महाराष्ट्राचे ते मार्टिन ल्युथर म्हणून ओळखले जातात. तसेच ते भारतातील आद्यशिक्षक म्हणून ओळखले जातात.

महात्मा ज्योतिबा फुल्यांनी स्त्री शिक्षणाचा पाठपुरावा केला होता. पुणे येथे मुलींची शाळा स्थापन करून स्त्री शिक्षणाची सर्वप्रथम मुहूर्तमेढ रोवली. मुलींना प्रथम स्वतः शिकविले पण मुलींना शिकविण्यासाठी शिक्षिका मिळत नव्हत्या. म्हणून धर्मपत्नी सावित्रीबाई फुलेस स्वतः शिकवून त्यांना शिक्षिका केले. तसेच अस्पृश्यांना शिक्षण मिळावे. म्हणूनही शाळा काढल्या होत्या. त्यांनी स्थापन केलेल्या शाळांची संख्या अठरा होती.

हंटर शिक्षण आयोगापुढे १९ सप्टेंबर १८८२ मध्ये महात्मा फुल्यांनी एक निवेदन सादर केले होते. ते निवेदन शिक्षण पध्दतीचा मूलमंत्र देणारा दस्तावेजच ठरतो. त्यात त्यांनी मुलांना वयाच्या १२ वर्षे पर्यंत प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करावे, लोकल सेस फंडातून अर्धी रक्कम प्राथमिक शिक्षणासाठी खर्च करावी, प्राथमिक शाळांची संख्या वाढवावी., प्राथमिक शाळेत प्रशिक्षित शिक्षक नेमावेत इत्यादी सूचना केल्या होत्या.

महात्मा ज्योतिबा फुले हे कर्ते सुधारक होते. त्यांनी प्रथम कार्य करून दाखविले. आपल्या विचाराचा प्रसार करण्यासाठी त्यांनी तृतीय रत्न हे नाटक लिहून त्यातून शिक्षण म्हणजे माणसाचा तिसरा डोळा असा संदेश दिला आहे.

परंतु शिक्षण हा माणसाचा कणाच ठरतो असे म्हटल्यास वावगे होणार नाही. कारण शरीराला ज्याप्रमाणे उभे राहण्यासाठी माकड हाडाची, कणाची आवश्यकता असते. तसेच व्यक्तीला समाजात वावरण्यासाठी, सन्मानाने जगण्यासाठी उत्तुंग भराऱ्या घेण्यासाठी, ताठपणे उभे राहण्यासाठी शिक्षणरूपी कणाच सहाय्यक ठरतो. अन्यथा याच्या अभावाने अज्ञान, अंधश्रध्दा, अजाणतेपणा यांच्या ओझ्याने माकडहाड नसल्याप्रमाणे शरीर झुकले जाईल. सन्मान, स्वाभिमान, प्रतिष्ठा प्राप्त करण्यासाठी तो उभाच असू शकणार नाही. अंधश्रध्दा नष्ट करण्यासाठी अंगारे, धुपारे करणे सोडा, व्यसन मुक्तीसाठी काही दिवस दारू सोडा व वाचलेल्या पैशातून ग्रंथ खरेदी करा असा सल्ला देतात. समाजास सर्वांगीण जाणीव निर्माण करून शिक्षणाद्वारे समाज परिवर्तन करावयाचे होते. महात्मा फुल्यांच्या कार्यापासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज, डॉ. भाऊराव पाटील, गाडगे महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना प्रेरणा मिळाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तर महात्मा फुल्यांना आपले गुरूच मानले होते.

महात्मा फुल्यांनी समाज परिवर्तनाचे कार्य करीत असतांना त्यांना स्वतःचे घरदार सोडावे लागले. पण त्याची त्यांना पर्वा वाटली नाही. सत्यशोधक समाजाची स्थापना करून जुन्या रूढीला मूठमाती देण्याचे कार्य आरंभिले होते. त्यामुळे समाजजाकृती होऊन समाजात एक नवाविचार संचरला होता. त्यांच्यावेळी काही पुढारलेल्या घराण्यातील मुली वाट चुकून आडवळणाने जात होत्या. त्यांना सरळमार्गाला लावण्याचे कार्य त्यांनी आरंभिले होते. विधवांच्या बाळांना आश्रय देण्यासाठी अनाथ बालगृहाची स्थापना केली होती. एकंदर सांगायचे म्हणजे विधवेपासून झालेल्या मुलास स्वतः दत्तक घेऊन त्याचे लग्न लावून दिले. आणि एक नवा आदर्श जनतेपुढे ठेवला.

**संदर्भ सूची :**

१) जोशी लक्ष्मण शास्त्री, मराठी विश्वकोश खंड १२, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.
२) डॉ. घोरमाडे के. यु, डॉ. घोरमाडे कला, शैक्षणिक विचारवंत, विद्या प्रकाशन, नागपूर.
३) डॉ. कठारे अनिल, फुले-शाहु-आंबेडकर, पुनम प्रकाशन, नांदेड.
४) जोशी दा. दा, महात्मा ज्योतिबा फुले, सुरेश एजन्सी, पुणे.
५) डॉ. गुंदेकर श्रीराम, म. ज्योतिबा फुले : साहित्य आणि साहित्य मुल्ये, प्रतिमा प्रकाशन, पुणे.